Yashoda Shikshan Prasarak Mandal's
**YASHODA TECHNICAL CAMPUS, SATARA**
NH-4, Wadhe Phata, Satara., Tele - 02162-271238/39/40
Website- https://www.yes.edu.in,,Email-registrar_ytc@yes.edu.in
Approved by PCI- New Delhi, Govt. of Maharashtra (DTE, Mumbai)
Affiliated to D Batu University, Lonere , Shivaji University, Kolhapur
MSBTE, Mumbai. Mobile No:- 9172220775

YSPM
NAAC B+

**Prof. Dasharath Sagare**
**Founder, President**

**Mr. G. K. Suravase**
**Registrar**

Ref. No.:-YSPM/YCP/ ADMIN/ 43 /2025-26

**Date:-** 09/09/2025

# नोटीस

यशोदा इन्स्टिट्यूट मधील शैक्षणिक वर्ष २०२५–२६ प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळुन) आणि विशेष मागास प्रवर्गातील अशा विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाला नाही व भाडयाने राहत असलेल्या **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार"** योजना शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सदर योजनेसाठी **https://hmas.mahait.org** या संकेतस्थळावर **ऑनलाईन व ऑफलाईन** या दोन्ही पध्दतीत शिष्यवृत्तीचा अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण समाजकल्याण, विभाग सातारा यांच्याकडे महाविद्यालयामार्फत **दि. १८/०९/२०२५** पर्यंत जमा करावयाचे आहेत, तरी पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी तात्काळ आपले वस्तीगृह शिष्यवृत्तीचे अर्ज भरून योग्य कागदपत्रासह महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाकडे जमा करावेत. जे विद्यार्थी वेळेत अर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

Yashoda Technical Campus * Satara * 6757

Registrar
Yashoda Technical Campus
Satara.

सोबत:– १) GR माहीतीसाठी जोडत आहे.
२) ऑफलाईन अर्ज जोडत आहे

**इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी " ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना " साठी निकष व अटी लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई-४०००३२.
दिनांक : ११ मार्च, २०२४

**वाचा :-**

१) इमाव, सावशैमाप्र, विजाभज आणि विमाप्र कल्याण विभाग,शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१६/प्र.क्र.५८/विजाभज-१, दिनांक ३०/१/२०१९

२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दिनांक २७/११/२०१८.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६ प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दिनांक ०६/०१/२०१७.

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१८/ प्र.क्र.३१९/शिक्षण-२, दिनांक २१/१२/२०१८

५) इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग शासन निर्णय क्र. धवगृ-२०१९/ प्र.क्र.१२६/मावक,दि.०६/०९/२०१९

६) इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. वगृयो-२०२२/प्र.क्र.११ / योजना-५, दि.१३/१२/२०२३

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यास संदर्भिय दि.१३.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या लाभार्थ्यांसाठी निकष व इतर अटी-शर्ती ठरविण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्त्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यास आवश्यक निकष व इतर अटी-शर्तीस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यासाठी निकष व इतर अटी-शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी संबंधित जिल्हयातील सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांचेकडे ऑनलाईन / ऑफलाईन अर्ज सादर करतील. सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) हे अर्जाची छाननी करतील आणि पात्र लाभार्थ्यांना जवळचे मागासवर्गीय मुला/ मुलींचे वसतिगृहाचे गृहपाल यांचेशी संलग्न (attach) करतील.

## २.१ मुलभूत पात्रता

१. विद्यार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.

२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

३. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.

५. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे ४०% पेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

६. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

७. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील.

८. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

## २.२ शैक्षणिक निकष

१. सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

२. व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/ CGPAचे गुण असणे आवश्यक राहील.

३. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार त्या संबंधित प्रवर्गातून प्रवेश देण्यात येतील. यासाठी इयत्ता १२ वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.

४. सदर योजनेतंर्गत एकूण प्रवेश संख्येच्या ७० % जागा व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व ३० % जागा बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतील.

५. निवडलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यत लाभास पात्र राहील.

६. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात / संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

७. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

८. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती किमान ७५% असावी. तथापि, एखाद्या विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शंका निर्माण झाल्यास संबंधित महाविद्यालयामध्ये

विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शहानिशा करून विद्यार्थ्यास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत संबंधित सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) कार्यालयाकडून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

९. निवड करण्यात आलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

### २.३ इतर निकष

१. योजनेचा लाभ १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास देण्यात येईल. तथापि एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ५ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल. परंतु, इंजीनिअरिंग / वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ६ वर्षे अनुज्ञेय असेल.

२. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. अभ्यासक्रमाच्या मध्यावधी कालावधीत प्रवेश घेतलेला विद्यार्थी ही ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत लाभास पात्र असेल.

४. शिक्षणात खंड पडलेला विद्यार्थी आधार योजनेंतर्गत लाभास पात्र असेल. तथापि, सदर विद्यार्थी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या वयोमर्यादेपेक्षा अधिक वयाचा नसावा.

५. सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण कालावधीमध्ये योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही. उत्तीर्ण झाल्यानंतर असा विद्यार्थी लाभास पुढे पात्र राहील. तथापि, उपरोक्त ५ वर्षाचा कालावधी विचारात घेताना उत्तीर्ण व अनुत्तीर्ण असे दोन्ही कालावधींची गणना करण्यात येईल.

६. सदर योजनेतंर्गत सन २०२४-२५ करिता प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थी अशा रितीने प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल. तद्नंतर सन २०२५-२६ पासून व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश देय राहिल. ज्या पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांस पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश देय आहे त्याच पदवी अभ्यासक्रमास द्वितीय वर्षाकरिता प्रवेश देय राहील. उर्वरीत सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षात प्रवेश देय राहील. त्यासाठी त्या त्या वेळी स्वतंत्रपणे जिल्हा सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांच्याकडे शासन परिपत्रक क्र.वगृयो-२०२३/प्र.क्र.१२/योजना-५, दि.१३.०३.२०२३ मधील विहित नमुन्यात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल.

७. विद्यार्थ्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या, आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा. तसेच, ज्या विद्यार्थ्यांस इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे त्यास सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय नसेल.

८. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

९. विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी सदर योजनेमध्ये फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहतील. तसेच योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न करता लाभ घेणे, शिक्षण न घेता नोकरी /व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर देखील असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व दिलेल्या रकमेची व्याजासह वसुली करण्यात येईल.

१०. सदर योजनेतंर्गत खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित करण्यात येत आहे.

| सामाजिक प्रवर्ग | सदर योजनेतंर्गत अनुज्ञेय आरक्षण |
|---|---|
| इतर मागास प्रवर्ग | ५९ |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | ३४ |
| विशेष मागास प्रवर्ग | ६ |
| अनाथ | १ |
| एकुण | १०० |

११. योजनेतंर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ४% समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे असेल. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेची किमान टक्केवारीची मर्यादा ५०% इतकी राहील, व यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

१२. सदर योजनेतंर्गत महिलांसाठी ३०% समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे आरक्षण अनुज्ञेय असेल.

**२.४ योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:-**

- भाडयाने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी)
- स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत)
- कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र
- भाडयाने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडे करारपत्र / करारनामा
- महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा

**२.५ अनुदान वितरण:-**

सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे अनुदान वितरण करण्यात यावे -:

योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली भोजन, निवास व निर्वाहभत्त्याची पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात संचालक स्तरावरील मध्यवर्ती खात्या-मधून आगाऊ जमा करण्यात यावी. सदरहू योजनेकरिता पात्र लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्याकरिता खालील तक्यात नमूदप्रमाणे वेळापत्रक ठरविण्यात येत आहे-

| हप्ता | त्रैमासिक कालावधी | रक्कम जमा करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| पहिला हप्ता | माहे जून ते माहे ऑगस्ट | ज्या दिवशी विद्यार्थ्याचा / विद्यार्थीनीचा ऑनलाईन / ऑफलाईन अर्ज मंजूर होईल, त्यानंतर ७ दिवसामध्ये. |
| दुसरा हप्ता | माहे सप्टेंबर ते माहे नोव्हेंबर | माहे ऑगस्टचा दुसरा आठवडा |
| तिसरा हप्ता | माहे डिसेंबर ते माहे फेब्रुवारी | माहे नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| चौथा हप्ता | माहे मार्च ते माहे मे | माहे फेब्रुवारीचा दुसरा आठवडा |

तक्यात नमुद वेळापत्रक हे जरी १२ महिन्यांचा कालावधी दर्शवित असले तरी प्रस्तूत योजनेतर्गत पात्र लाभार्थ्यास एका शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांचा कालावधीसाठी लाभ अनुज्ञेय राहील. सदर १० महिन्यांचा लाभ निश्चित करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांची राहील. तथापि, लाभाची रक्कम जमा करताना प्रत्येक तिमाहीमध्ये देय असलेली रक्कम जमा करावी.

- अनुज्ञेय रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या बँक खात्याशी त्यांचा आधार कार्ड क्रमांक संलग्न करण्यात येईल.
- या योजनेत लाभास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांस इतर कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
- विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ % असणे आवश्यक राहील, याबाबत संबंधित संस्थेकडून प्रत्येक तिमाहीस उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**२.६ संनियंत्रणः-**

- सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) तसेच संबंधित जिल्हयातील वसतिगृहाचे गृहपाल, यांचे संनियंत्रण राहील. तसेच प्रस्तुत योजनेची राज्यस्तरावरील लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्याची जबाबदारी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांची राहील.
- विद्यार्थ्याने प्रत्येक सत्र परिक्षेचा निकाल १५ दिवसाच्या आत देणे बंधनकारक राहील.
- विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ संबंधित अभ्यासक्रमाच्या कालावधीपर्यंतच देय असेल. (उदा. इंजिनिरींग अभ्यासक्रम कालावधी ४ वर्षे असल्यास त्यास ४ वर्षेच लाभ मिळेल) विद्यार्थ्याने खोटी माहिती व कागदपत्रे देवून लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेवून गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास तो कारवाईस पात्र राहील. तसेच त्यास दिलेल्या रकमेची १२ % व्याजासह वसुली केली जाईल.
- सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या ज्या विदयार्थ्यांना पदवी/पदव्युत्तर पदवी हे शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करतांना एटीकेटी (ATKT) प्राप्त झाली त्या विदयार्थ्याला फक्त एकदाच या अटीतून सुट देण्यात येईल. (म्हणजेच एखादया विदयार्थ्यास दुसऱ्यावेळेस एटीकेटी मिळाल्यास तो सदर योजनेचा पुढील लाभ घेण्यास अपात्र ठरेल.)
- ज्या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्याने संबंधित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदर योजनेअंर्गत अनुज्ञेय रक्कमेपैकी पहिल्या तिमाहीची रक्कम आगावू देण्यात येईल व त्यानंतर शैक्षणिक संस्थेच्या प्रत्येक तिमाहीची हजेरी ७५ % पेक्षा जास्त असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर उर्वरीत तिमाहिची रक्कम अदा केली जाईल. ही अदा करण्यात येणारी रक्कम आधार संलग्न बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- सर्व प्रादेशिक उप संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) हे त्यांच्या अधिनस्त प्रादेशिक विभागातील सर्व जिल्हयाच्या सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांच्या सहाय्याने सदर योजनेचा मासिक आढावा घेतील.
- सदर योजनेच्या अटी व शर्ती वेळोवेळी आवश्यक वाटल्यास सुधारीत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

०३. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी “ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना” ही योजना राबविल्यामुळे शाश्वत विकास ध्येय क्र.२,४,१० चे लक्ष्य क्र.२.१,४.१,१०.२ सन २०३० पर्यत साध्य करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

०४. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडजी-३, वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इमाव, विजाभज (स्वयंम योजनेचा लाभ घेणारे धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना (कार्यक्रम) (२२२५एफ८३५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

०५. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०३१११५३४४५३८३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशा नुसार व नावाने,

**( दिनेश चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. सभापती, विधान परिषद यांचे खासगी सचिव.
३) मा. अध्यक्ष, विभानसभा यांचे खासगी सचिव.
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्ष नेता,विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
८) मा. मंत्री (इ.मा.ब.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१२) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
१३) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
१४) सर्व प्रादेशिक उपायुक्त, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.
१५) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण, सामाजिक न्याय विभाग.
१६) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) निवासी लेखा परिक्षक, मुंबई.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२०) निवड नस्ती (योजना-५).

**वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील समाजाच्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

**सन-2025-26**

| अर्जदाराचा रंगीत फोटो |
|---|

आवेदनपत्र भरण्यापुर्वी ते काळजीपूर्वक वाचून भरावे

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | | |
|---|---|---|---|
| आवेदनपत्र आवक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | गुण | टक्केवारी |
| | | एकूण गुण :-<br>प्राप्त गुण :- | |

प्रति,

मा.सहाय्यक संचालक,

इतर मागास बहुजन कल्याण, सातारा

महोदय,

मी शासकिय वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता सुरु केलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी माझे आवेदनपत्र सादर करीत आहे. आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे. मी सदर योजनेच्या अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या असून त्या मला अवगत झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळाल्यास मी सदर योजनेसाठी लागू असलेल्या सर्व नियमांचे व अटींचे कसोशिने पालन करीन अशी मी हमी देत आहे.

सदर योजनेचा लाभ घेताना खोटी कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याचे आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास, शिक्षण न घेता नोकरी/व्यवसाय करून या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास मी कारवाईस पात्र राहील व सदर योजनेअंतर्गत मला मिळालेली रक्कम (18 टक्के) व्याजासह शासनास परत करेन.

दिनांक — आपला/आपली विश्वासू,

स्थळ:- — (अर्जदाराची स्वाक्षरी)

नाव : ----------------------------------------

मोबाईल क्र ----------------------------------------

आधार क्र ----------------------------------------

**वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील समाजाच्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना-अर्जाचा नमुना**

<table>
<tr><td colspan="2">अर्जदाराची माहिती :-</td></tr>
<tr><td colspan="2">अ) 1. अर्जदार विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :- --------------------------------------------------</td></tr>
<tr><td colspan="2">2. वडिलांचे पूर्ण नाव :- ----------------------------------------------------------------------</td></tr>
<tr><td colspan="2">3. अर्जदार विद्यार्थीनी विवाहीत असेल तर पतीचे नाव व पत्ता :- ----------------------------------------</td></tr>
<tr><td colspan="2">4. आईचे पूर्ण नाव :- ------------------------------------------------------</td></tr>
<tr><td colspan="2">5. जात व प्रवर्ग :- --------------------------------</td></tr>
<tr><td>6. (i) अर्जदाराचे मूळ राहण्याचे ठिकाण व पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (पिनकोडसह)</td><td>घर क्रमांक : .............. रस्ता/गल्ली : ....................<br>गाव/शहर : ................. तालुका : ............................<br>जिल्हा : .................... पिन कोड : ........................</td></tr>
<tr><td rowspan="3">(ii) उपविभागीय अधिकारी/उपजिल्हाधिकारी यांनी दिलेला रहिवासी दाखला</td><td>प्रमाणपत्राचा क्रमाक : ...............................</td></tr>
<tr><td>दिनांक : .......................................</td></tr>
<tr><td>कार्यालयाचे नाव : ...................................................</td></tr>
<tr><td>7. अर्जदाराचा मोबाईल क्रमांक असल्यास दुरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह)</td><td>मो:-.................................................<br>दुरध्वनी:-.............................................</td></tr>
<tr><td>8. अर्जदार दिव्यांग आहे काय ? दिव्यांगत्वाचा प्रकार व टक्केवारी</td><td>....................................................</td></tr>
<tr><td colspan="2">ब) जातीच्या दाखल्याचा तपशील :-</td></tr>
<tr><td rowspan="2">(i) अर्जदाराने ज्या जिल्हयातून जातीचा दाखला काढला आहे त्या जिल्हयाचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>प्रमाणपत्र क्र. . जारी केल्याचा दि. ................<br>जात : गाव : ................................<br>तालुका : .......... जिल्हा : ............................</td></tr>
<tr><td>जात पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राचा तपशील</td><td>प्रमाणपत्र क्र. ............दिनांक :-<br>जा.प्र.प.समितीचे नाव:-..................</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **क) आधार कार्डाचा तपशील :-** | |
| (i) अर्जदाराचा आधारकार्ड क्रमाक | |
| (ii) आधारकार्डवरील पत्ता | |
| **ड) बँकेचा तपशील :-** | |
| 1) राष्ट्रीयकृत/शेडयूल्ड बँकेचे नाव | |
| 2) शाखा | |
| 3) खाते क्रमांक | |
| 4) I.F.S.C. कोड | |
| 5) बँक खाते आधारकार्डाशी संलग्न केल्याचा पुरावा | |
| **इ) प्रवेशित महाविद्यालयाची माहिती :-** | |
| 1) प्रवेशीत महाविद्यालयाचे नाव | |
| 2) महाविद्यालयाचा पत्ता | |
| 3) महाविद्यालयातील प्रवेश नोदंणी क्रमांक/ ID क्र. | |
| **इ) प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती:-** | |
| 1) अभ्यासक्रमाचे नाव | |
| 2) प्रवेशित वर्ष (प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ/पाचवे) | |
| 3) प्रवेश दिनांक | |
| 4) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा) | |
| 5) अभ्यासक्रम =पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी | |

| **ग) गुणांची टक्केवारी :-** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रवेशीत वर्ष | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
| इयत्ता 12 वी | | | | | |
| पदवी | | | | | |
| टिप : 1. गुणांच्या ऐवजी ग्रेडेशन असल्यास ग्रेडेशन नुसार येणारी टक्केवारी द्यावी.<br>2. जे लागू नसेल ते खोडावे. | | | | | |

| | |
|---|---|
| **ह)** (i) अर्जदाराने विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देय असणाऱ्या शिष्यवृत्ती/शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क योजनेचा लाभ घेतला आहे का ? | |
| (ii) घेतला असल्यास त्याचा युजर आय. डी. क्रमांक | |

**अर्जदाराच्या पालकांची माहिती :-**

| | |
|---|---|
| 1) पालकांचे पूर्ण नाव | |
| 2) पालकाचे अर्जदाराशी नाते | |
| 3) वडिल जिवीत नसल्यास त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्राची साक्षांकिंत प्रत जोडावी | |
| 4) पालकांचा व्यवसाय | |
| 5) जेथे व्यवसाय करतात तेथील पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| 6) पालकाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न. तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र | र.रुपये : |

मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास किंवा माझ्या पाल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्याचा सदर योजनेचा मिळत असलेला लाभ रद्द होईल, याची तसेच अशाप्रकरणी माझ्या पाल्यास मिळालेली रक्कम 18 टक्के व्याजासह मी शासनास परत करीन अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ :-

दिनांक :-

साक्षीदार :-

नाव :- 1) --------------------------------

स्वाक्षरी--------------------

2) --------------------------------

स्वाक्षरी--------------------

पालकाची स्वाक्षरी

**इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता असलेल्या योजनेच्या अर्जासाठी शैक्षणीक संस्थेने द्यावयाची माहिती**

| | |
|---|---|
| अ) 1. विद्यार्थ्याचे नाव | |
| 2. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणीक संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | |
| 3. महाविद्यालय कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे | |
| 4. अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व त्याचा कालावधी | |
| 5. महाविद्यालयास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | |
| 6. महाविद्यालय व्यवस्थापनाचा प्रकार (शासकीय/शासन अनुदानित/खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यीत/अभिमत इ.) | |
| 7. महाविद्यालयाचा इ-स्कॉलरशीपचा युजर आय.डी.क्रमांक | |
| 8. विद्यार्थ्याचा प्रवेश नोदंणी क्रमांक/जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक | |
| **ब) विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची माहिती :-** | |
| (1) अभ्यासक्रमाचे नाव | |
| (2) प्रवेशित वर्ष (पहिले/दुसरे/तिसरे) | |
| (3) प्रवेश दिनांक | |
| (4) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| (5) प्रकार – (अनुदानित/विनाअनुदानित) | |
| (6) अभ्यासक्रम (पदवी/पदविका/पदव्युत्तर) (इतर असल्यास नोंद करावी.) | |
| (7) आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जदाराने सादर केलेल्या गुणपत्रिकेनुसार त्यास इयत्ता 12 वी/ पदवी परीक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी | इयत्ता 12 वी चे गुण : टक्केवारी : ........................<br>पदवीचे गुण : टक्केवारी : .................... |
| (9) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात आणखी कोणत्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केलेला आहे. | |
| (10) अर्जदाराने आपल्या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी ज्य शैक्षणीक संस्थेत शिक्षण घेतले होते त्याची माहिती | |
| (11) अर्जदाराने कोणत्या कोटयातून प्रवेश घेतला आहे. (मॅनेजमेंट कोटा, CAP, स्पॉन्सर्ड कोटा, मायनॉरिटी, FWS (Fee Waiver Scheme), इतर | |

स्थळ :-

दिनांक :-

प्राचार्य

स्वाक्षरी व शिक्का

## R.T.G.S. साठी विद्यार्थ्यांनी भरुन द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

| | | |
|---|---|---|
| 1. | विद्यार्थ्याचे नाव (खातेपुस्तकानुसार) | |
| 2. | बँकेचे नाव | |
| 3. | शाखेचे ठिकाण | |
| 4. | बँक खाते क्रमांक | |
| 5. | IFSC Code | |
| 6. | MICR Code | |
| सोबत :- बँकेच्या खातेपुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स अथवा रद्द केलेला स्वाक्षांकित धनादेश जोडावा. | | |

विद्यार्थ्याची सही

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विद्यार्थ्याने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

| | |
|---|---|
| 1) विद्यार्थ्याचे पूर्ण नाव | |
| 2) शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव | |
| 3) अभ्यासक्रम | |
| 4) पालकांचा व्यवसाय | |
| 5) कालावधी | |
| 6) सन 2023-24 मधील प्रवेशित वर्ष | |
| 7) प्रवेश दिनांक | |
| 8) विद्यार्थ्याचा मुळ पत्ता | |
| 9) सध्याचा स्थानिक रहिवास पत्ता | |
| 10) दुरध्वनी क्रमांक | |
| 11) मोबाईल क्रमांक | |
| 12) ई-मेल | |
| 13) पालकाचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक | |

मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, वरिलप्रमाणे दिलेली माहिती सत्य असून सन 2024-25 मध्ये स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी मी असे शपथपूर्वक नमूद करतो/करते की, महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकरिता सध्या मी आई-वडिल तसेच नातेवाईक यांच्यासोबत राहत नाही. असे आढळून आल्यास मला सदर योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम मी 18 टक्के व्याजासह शासनास परत करीन व होणाऱ्या कार्यवाहीस मी जबाबदार असेन.

विद्यार्थ्याचे नाव :- ------------------------------- (स्वाक्षरी)

साक्षीदार :-

नाव :- 1) ------------------------------ स्वाक्षरी

2) --------------------------------------- स्वाक्षरी

**ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत प्रती जोडाव्यात (मुळ प्रमाणपत्रे जोडू नये)**

| | | |
|---|---|---|
| 1 | जातीचा दाखला | आहे/नाही |
| 2 | जात वैधता प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 3 | कॅप राऊंड लेटर | आहे/नाही |
| 4 | महाराष्टाचा रहिवासी असल्याचा पुरावा ( वय /अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र/ रेशन कार्ड प्रत) | आहे/नाही |
| 5 | आधार कार्डाची प्रत | आहे/नाही |
| 6 | बँकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणून पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बँक स्टेटमेंटची प्रत किंवा रदद केलेला चेक. | आहे/नाही |
| 7 | तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 8 | विदयार्थीनी विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा | आहे/नाही |
| 9 | विदयार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 10 | इयत्ता 12 वी परिक्षेचे गुणपत्रक | आहे/नाही |
| 11 | महाविदयालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट | आहे/नाही |
| 12 | बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | आहे/नाही |
| 13 | विदयार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र | आहे/नाही |
| 14 | स्थानिक रहिवासी नसलेबाबतचे प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 15 | विदयार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा (खाजगी वसतिगृह, भाडे करारनामा इ.) | आहे/नाही |
| 16 | महाविदयालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र | आहे/नाही |
| 17 | सत्र परिक्षेच्या निकालाची प्रत | आहे/नाही |